# राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमांची आता ई-दैनंदिनी

## ५० हजार दैनंदिनीची छपाई बंद

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांची उपक्रम दैनंदिनी मुंबई विद्यापीठाने ई स्वरूपात केली आहे. त्यामुळे या वर्षीपासून ५० हजार दैनंदिनी छापणे, वितरण करणे आणि लेखी भरणे ही कामे यापुढे ॲपद्वारेच होतील. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनीच हे ॲप विकसित केले असून, नुकतेच राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसाच्या निमित्ताने २४ सप्टेंबरला त्याचे उद्घाटन झाले.

राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना दरवर्षी समाजात जाऊन १२० तासांचे उपक्रम करायचे असतात. या सर्व उपक्रमांची नोंद करण्यासाठी छापील स्वरूपातील दैनंदिनी (छोट्या आकाराची १५-२० पानांची डायरी) दिली जाते. यामध्ये नोंदवलेल्या वर्षभरातील कामाचे मूल्यमापन हे संबंधित महाविद्यालयाचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी आणि प्राचार्य यांच्याकडून केले जाते. त्यानुसार दहा गुण दिले जातात. हे सर्व काम छापील दैनंदिनीवर केले जायचे, यापुढे हे सर्व काम ऑनलाइन माध्यमातून होणार असल्याचे, मुंबई विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक सुधीर पुराणिक यांनी सांगितले.

दरम्यान, उपक्रम नोंदणी दैनंदिनीच्या ई स्वरूपामुळे अनेक बाबी सुकर होणार असल्याची अपेक्षा एनएसएसच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी व्यक्त केली. यापूर्वी



वर्षभराच्या कामाच्या नोंदी भरण्यासाठी कालावधीचे बंधन नसायचे. पण ॲपमुळे केवळ महिनाभरातील नोंदीच भरण्याचे बंधन असेल, जेणेकरून स्वयंसेवकाने केलेल्या कामांची लगेचच नोंद होईल. त्याची पडताळणी, मूल्यमापन या बाबीदेखील ऑनलाइनच होतील. त्याचबरोबर या ५० हजार दैनंदिनी छापणे, वितरण या सर्व बाबी यापुढे बंद होतील.

कुर्ला येथील डॉन बास्को इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कॉर्डिरिओ हेडन, सत्यम शर्मा, मानसी अनंतपूरकर, प्रियाल वाझ, शिवम सिंग आणि मालविका शेट्टी यांनी हे ॲप विकसित केले असून तय्यबजी सय्यद यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. सध्या हे ॲप मुंबई विद्यापीठातील महाविद्यालयांसाठी असले, तरी अन्य विद्यापीठांनादेखील हे तंत्रज्ञान योग्य ते बदल करून वापरता येईल.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिवसाच्या दूरस्थ दृक्श्राव्य कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे नवी दिल्ली संचालनालयाचे प्रमुख डॉ. कमल कुमार कार यांनी कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या उपस्थितीत या ॲपचे उद्घाटन केले.